महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- १४४२/समोवानि/२०२०/२४ दिनांक :- २१ ऑक्टोबर ,२०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-
## सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा-२०२०
## अंतिम निकाल

जाहिरात क्रमांक - ०२/२०२० व ०५९/२०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगतर्फे दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजी मुंबईसह औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आलेल्या **सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा-२०२०** या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण २३३ उमेदवारांची प्रस्तुत पदाकरिता शिफारस करण्यात येत आहे.

**२.**सदर परीक्षेमध्ये **ठाणे** जिल्ह्यातील **श्री. साळेकर अभिषेक भास्कर** (बैठक क्रमांक - MB001234) हे राज्यातून **प्रथम** आले आहेत. **पुणे** जिल्ह्यातील **श्री. गार्गाडे कांतिलाल दिलीप** (बैठक क्रमांक - PN006170) हे मागासवर्गवारीतून **प्रथम** आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **नांदेड** जिल्ह्यातील **श्रीमती सूर्यवंशी सरला विनायकराव** (बैठक क्रमांक-PN007309) ह्या **प्रथम** आल्या आहेत.

**३.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut-off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**४.** प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**५.** शिफारस यादीमध्ये # अशा चिन्हांनी दर्शविलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात माजी सैनिक असल्याचा केलेला दावा विचारात घेऊन या उमेदवारांची शिफारस माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदावर ते सैनिकी सेवेतील विहित वैध/पुरेसा अनुभव धारण करतात व ते माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी पात्र आहेत आणि त्यांच्याकडे माजी सैनिकांसाठी आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे आहेत, हे नियुक्तीपूर्वी शासन स्तरावर होणा-या विनिर्दिष्ट पडताळणीत पात्र ठरण्याच्या अटीच्या अधीन राहून, करण्यात येत आहे.

**6.** प्रस्तुत निकालानुसार अनाथ, खेळाडू, मागास इत्यादींसाठी आरक्षित पदावर शिफारसपात्र उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

**७.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्दयांसदर्भात तसेच अन्य मुद्दयासंदर्भात मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**८.** प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

**ठिकाण** : मुंबई **उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)**

**दिनांक** : २१ ऑक्टोबर, २०२२ **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**